महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र.
दि.

# कार्यालयीन परिपत्रक

विषय :- नव्याने विकसीत होणाऱ्या बांधकामामध्ये झाडे लावण्याबाबत.

शहरामध्ये नव्याने विकसीत हेणाऱ्या बांधकामामध्ये झाडे लावण्याबाबत आवश्यकता आहे. त्यासाठी नव्याने विरळ क्षेत्रामध्ये होणाऱ्या बांधकामांमध्ये झाडे लावून घेण्या बाबत खाली नमुद केल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ)<u>झाडे लावण्याचे प्रमाण</u>

१) प्लॉट क्षेत्र ५०० चौ.मी पर्यंतच्या बांधकाम क्षेत्रासाठी प्रति १०० चौ.मी. क्षेत्रासाठी १ झाड लावणे.

२) प्लॉट क्षेत्र ५०० चौ.मी ते २००० चौ.मी. मधील नियोजित बांधकाम क्षेत्रासाठी प्रति ८० चौ.मी क्षेत्रासाठी १ झाड लावणे.

३) प्लॉट क्षेत्र २०००चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्रासाठीच्या प्लॉट मध्ये नियोजित बांधकाम क्षेत्रासाठी ८० चौ.मी. क्षेत्रासाठी १ झाड लावणे.

ब) सदर झाडे लावण्यासाठी प्लॉटच्या हद्दीवर झाडांसाठी किमान ०.६० मी रुंदीची जागा ठेवण्यात यावी. त्यामध्ये माती व तदनुषंगिक मटेरियल भरण्यात यावे.

प्लॉट क्षेत्र २००० चौ.मी ते ४००० चौ.मी. असेल तर त्या प्लॉट मध्ये हद्दी लगत किमान १.०० मी रुंदीची जागा झाडे लावण्यासाठी ठेवण्यात यावी. तसेच ४०००चौ.मी. क्षेत्राचे हद्दी पेक्षा जास्त क्षेत्राचे प्लॉटमधे किमान १.५० मी रुंदीचे जागा ठेवण्यात यावी. सदर जागेमध्ये जरुरी प्रमाणे अन्य सुविधा उदा. ट्रान्सफॉर्मर, गांडूळ खत प्रकल्प, पाण्याची टाकी इत्यादी व अन्य देखील करता येतील.

क) ज्या प्लॉटस् मध्ये दर्शनी भागामध्ये व्यापारी वापर किंवा दुकाने-तळ मजल्यावर असतील तर त्या प्लॉट मध्ये रस्त्याच्या बाजूस दर्शनी भागामध्ये प्लॉटच्या हद्दीवर ४.५० मी. अंतराने झाडे लावणे ( आत व बाहेर जाण्या-येण्यासाठीचे प्रवेश मार्ग वगळून)

ड) प्लॉट क्षेत्र २००० चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या प्लॉट मध्ये असलेल्या ओपन स्पेस मधील किमान २५% क्षेत्र हे फक्त माती साठी मोकळे ठेवावे व तेथे कोणत्याही प्रकारचे पेव्हींग करु नये. परंतू येथे या धोरणा प्रमाणे वृक्ष लागवड करता येईल .

ज्या प्लॉटस् मध्ये पूर्णतः व्यापारी किंवा आय्. टी चा वापर नियोजित असेल त्या प्लॉटस् मध्ये ओपन स्पेस मधील ७०% क्षेत्र हे माती साठी राखीव ठेवावे व तेथे कोणत्याही प्रकारचे पेव्हींग करु नये परंतू येथे या धोरणा प्रमाणे वृक्ष लागवड करता येईल .

इ) झाडे लावण्यात येणाऱ्या दोन झाडामधील किमान अंतर ४.०० मी. इतके ठेवण्यात यावे.

फ) झाडे ही भारतीय व स्थानिक क्षेत्रामधील जातींची असावित. (सोबतच्या यादी प्रमाणे)

ग) प्रत्येक प्लॉट साठी प्रोव्हीजनल नाहरकत पत्र हे उद्यान विभागा कडून घेण्यात यावे. त्यामध्ये प्लॉट मधील इमारत त्या मध्ये लावण्यात योणाऱ्या झाडांची संख्या व अंतरे इ. स्पष्टपणे दर्शवून घेण्यात यावे.

ह) एका टेनामेंट/बंगल्यासाठी वरील बाबी लागू राहणार नाहीत.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

# स्थानिक जातीच्या वृक्षांची नावे

| अ. क्र. | वृक्षाचे नाव | अ. क्र. | वृक्षाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | करमळ | ३६. | करंज |
| २. | मंगोलिया | ३७. | तिवस |
| ३. | सोनचाफा | ३८. | भद्रास |
| ४. | पांढरा चाफा | ३९. | अर्जुन |
| ५. | अशोक | ४०. | हिरडा |
| ६. | शेंदरी | ४१. | जांभूळ |
| ७. | वयवर्ण | ४२. | तामन |
| ८. | कोकम | ४३. | कदंब |
| ९. | नागचंपा/नागकेसर | ४४. | हलदू |
| १०. | कनक | ४५. | निलगिरी |
| ११. | साल | ४६. | मोह |
| १२. | पांढरी धूप | ४७. | खिरणी |
| १३. | भेंडी | ४८. | पारिजात |
| १४. | गोरख चिंच | ४९. | सात्विन |
| १५. | रुद्राक्ष | ५०. | आकाश निम |
| १६. | बेल | ५१. | कलावश |
| १७. | कवठ | ५२. | शिवन |
| १८. | सालई | ५३. | साग |
| १९. | नीम | ५४. | चंदन |
| २०. | बोर | ५५. | आवळा |
| २१. | रिठा | ५६. | पुत्रावती |
| २२. | कुसूम | ५७. | वड |
| २३. | बाभूळ | ५८. | पिंपळ |
| २४. | सौंदड | ५९. | रबर |
| २५. | शिरीष | ६०. | फणस |
| २६. | मुचकूंद | ६१. | मलबेरी |
| २७. | बहावा | ६२. | करवट |
| २८. | कांचन | ६३. | चिनार |
| २९. | चिंच | ६४. | सुरु |
| ३०. | पळस | ६५. | इंडियन पॉप्युलर |
| ३१. | पांगारा | ६६. | वाळूंज |
| ३२. | बिबवा | ६७. | खजूर |
| ३३. | रक्त चंदन | ६८. | महारुख |
| ३४. | सेम्र कुड शिसू | ६९. | ऐन |
| ३५. | शिसम | ७०. | ताड |

## स्थानिक जातीच्या वृक्षांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| ७१. | कैलासपती | १०६. | टेटू |
| ७२. | सुपारी | १०७. | तिवस |
| ७३. | नारळ | १०८. | सिंधी |
| ७४. | केवडा | १०९. | शमी |
| ७५. | बांबू | ११०. | बिजा |
| ७६. | पिंपरण | १११. | खैर |
| ७७. | देवदार | ११२. | रीठा |
| ७८. | पाईन | ११३. | सिता अशोक |
| ७९. | पांढरा शिरीष | ११४. | बीबा |
| ८०. | रक्त रोहिडा | ११५. | हादगा |
| ८१. | धावडा | ११६. | अंबाडा |
| ८२. | हिंगणबेट | ११७. | जंगली बदाम |
| ८३. | आपटा | ११८. | अर्जुन |
| ८४. | काटे सायर | ११९. | बेहडा |
| ८५. | ताड | १२०. | बीट्टी |
| ८६. | आसन | १२१. | नांदरुख |
| ८७. | पाचुंदा | १२२. | पायर |
| ८८. | अंजन | १२३. | डिकामली |
| ८९. | मोहगणी | १२४. | साग |
| ९०. | भोकर | १२५. | जांभूळ |
| ९१. | दांडूस | १२६. | आवळा |
| ९२. | सिसू | १२७. | पेरु |
| ९३. | टेंभुणी | १२८. | डाळींब |
| ९४. | उंबर | १२९. | संत्रा |
| ९५. | अनंत | १३०. | मोसंबी |
| ९६. | काकड | १३१. | चिकू |
| ९७. | शिवण | १३२. | |
| ९८. | पापडा | १३३. | |
| ९९. | [illegible] | १३४. | |
| १००. | आंबा | १३५. | |
| १०१. | बकान | १३६. | |
| १०२. | कळंब | १३७. | |
| १०३. | बारतोंडी | १३८. | |
| १०४. | तुती | १३९. | |
| १०५. | कडीपत्ता | १४०. | |